**“मे २०१८” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक २ मे २०१८ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना मंत्रालयीन संवर्गासाठी राबविण्यासाठी सहसचिव (कार्यासन-१४), सामान्य प्रशासन विभागाच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समितीतील सदस्य श्री.ध.मा.कानेड, उपसचिव (कार्यासन-१८) यांच्याऐवजी श्री.वि.रा.ठाकूर, उपसचिव (कार्यासन-१२अ) यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

- दिनांक २ मे २०१८ च्या पत्रान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंत्रालयातील १६५ सह / उपसचिव संवर्गातील अधिकाऱ्यांसाठी एक दिवसाचे नवीन विषयाची तोंड ओळख प्रशिक्षण दिनांक १४ ते १७ मे २०१८ या कालावधीती यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे.

- दिनांक ३ मे २०१८ च्या शासन आदेशान्वये मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेंतर्गत मंत्रालयीन विभागातील दप्तर तपासणीसाठी चार पथके तयार करण्यात येऊन त्यांना विभाग नेमून देण्यात आले आहेत.

- दिनांक ३ मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये भाप्रसे (संवर्ग) नियम १९५४ मधी नियम-४(२) मधील परंतुकानुसार Apex Scale (Level-१७ in the Pay Matrix) या संवर्गात दिनांक १ मार्च ते ३० एप्रिल २०१८ पर्यंत १ पद आणि दिनांक १ मे २०१८ ते ३१ जुलै २०१८ पर्यंत १ पद निर्माण करण्यास केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या महाराष्ट्रातील भाप्रसे संवर्ग संख्याबळ आढावा प्रस्तावाच्या अधीन राहून मंजुरी देण्यात आली आहे.

- दिनांक ८ मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालय तसेच क्षेत्रीय स्तरावर मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शनपर सूचना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक १० मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवेतील विविध श्रेणीतील पदोन्नती संदर्भात छाननी समिती / आस्थापना मंडळ-१ गठित करण्यात आला आला आहे.

- दिनांक १० मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्या करणाऱ्या नागरी सेवा मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे.

- दिनांक १० मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये सीपीटीपी-३ अंतर्गत मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर दिनांक २ मे २०१६ पासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात आलेल्या पदांमधील १६ अधिसंख्य पदांना दिनांक ३१ मे २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

- दिनांक १० मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवेतील आणि राज्य शासकीय वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांना पुरेशी शासकीय विश्रामगृह व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने, गृहनिर्माण विभागांतर्गत म्हाडाकडील जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासातून उपलब्ध होणाऱ्या सदनिकांसाठी Board Resolution संमत करणे, विहित तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसह सदनिकांचे सुसज्जीकरण आणि केटरिंगकरिता बाह्ययंत्रणामार्फत निविदा प्रक्रिया राबवून विश्रामगृह व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई (म्हाडा) मार्फत दिनांक १५ ऑगस्ट २०१८ पर्यंत पूर्ण करावयाची आहे.

- दिनांक १९ मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामधील एप्रिल ते जून २०१८ करिता यशदा, पुणे या संस्थेस वेतनाच्या खर्चापोटी रु.२.७० लाख इतके सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.

- दिनांक २१ मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये अस्तित्वात असलेल्या गट-अ (ग्रेड पे रु.७६०० पेक्षा कमी) व गट-ब मधील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या नव्याने उद्भवणाऱ्या विभागीय चौकशा निकाली काढण्यासाठी मंत्रालयीन उपसचिव वा समकख अथवा त्यावरील वेतनश्रेणीतील पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांचे पॅनल तयार करुन, या पॅनलमधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करुन त्यांच्याकडे विभागीय चौकशीची प्रकरणे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या यंत्रणेत व कार्यपद्धतीत सुधारणाही करण्यात आली आहे.

- दिनांक २२ मे २०१८ च्या शासन ज्ञापनान्वये सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या १०७ उमेदवारांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व आयोगाचया कार्यालयाती सहायक कक्ष अधिकारी पदावर नियतवाटप करण्यात आले आहे.

- दिनांक २८ मे २०१८ च्या शासन निणर्यान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ अंतर्गत नियम-४(२)(अ) नुसार शासन सेवेत सरळसेवेने नियुक्तीच्या पदावर रुजू होण्याचा कालावधी विहित करण्यात आला आहे तसेच काही सूचना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक ३० मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ नुसार कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील १४ उमेदवारांना दिनांक १ जून २०१८ पासून मंत्रालयीन विभागात नियमित पदस्थापना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक ३१ मे २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर शिस्तभंगविषयक कारवाई संपुष्टात आणण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

**(ख) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील ३२ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- अवर सचिव-१६, कक्ष अधिकारी-८४, सहायक कक्ष अधिकारी-१८०, वरिष्ठ स्वीय सहायक-१, निवडश्रेणी लघुलेखक-१, उच्चश्रेणी लघुलेखक-२०, लिपिक टंकलेखक-१०४ अशा संवर्गातील ४०६ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील ३ कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील १ कर्मचाऱ्याच्या बदलीला स्थगिती देण्यात आली आहे.

**<u>(ग) पदोन्नती / प्रपत्र बढती व मुदतवाढ / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील ७ कर्मचाऱ्यांना निवडश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गातील १८ कर्मचाऱ्यांना उच्चश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. लघुटंकलेखक संवर्गातील २ कर्मचाऱ्यंना निम्नश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.
- २ उच्चश्रेणी लघुलेखकांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- अवर सचिव, कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे ४ व ३ अशा एकूण ७ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- १ अवर सचिवाचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- सहसचिव, कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे १ व २ अशा ३ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) <u>प्रशिक्षण</u>**

- दिनांक २४ मे २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये  मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील सहायक कक्ष अधिकाऱ्यांचे सन २०१८ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण वर्ग दिनांक २८ मे २०१८ पासून परिषद सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे  आयोजित करण्यात आले आहे.

**(छ) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक ३ मे २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये  मंत्रालयीन विभागातील १३७९  सहायक कक्ष अधिकाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१६ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

***********